# जागतिक प्रार्थना दिन - २०२२

## शुक्रवार, ४ मार्च २०२२

**विषय : तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो.**

**यिर्मया २९:१ ते १४**

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड  या ‘जागतीक प्रार्थनादिन’ समिती कृत.**

## माहितीपूर्ण प्रार्थना - प्रार्थनापूर्वक कृती

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड  या देशाच्या स्त्रियांबरोबर या प्रार्थनेत भाग घेणाऱ्या जगातील सर्व स्त्रिया, पुरुष,मुले, युवक यांना ही प्रार्थना फलदायी ठरो अशी आमची प्रार्थना आहे.**

# जागतिक प्रार्थना दिन २०२२

## शुक्रवार ४ मार्च २०२२

**विषय : तुम्हांविषयी माझ्या मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो.**

**यिर्मया २९:१ ते १४**

**इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या 'जागतीक प्रार्थनादिन' समिती कृत.**

**पूर्व तयारी :** हा कार्यक्रम ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी आणि १३ ते १८ वयोगटासाठी युवकांसाठी तयार करण्यात आला आहे. यात अनेक उपक्रम आहेत. त्यांचे नियोजन करावे व त्याप्रमाणे तयारी करावी.

**संकल्पना : ''तुम्हांविषयी जे मनांत जे संकल्प आहेत ते मी जाणतो. ''**

यिर्मया २९: १ ते १४ वर आधारित आहे.

देव नेहमी आपल्यासोबत आहे आणि आपल्याला आशा देतो.

- आपल्या आनंद व दु:खात ....
- आपल्याशी वाईट गोष्टी घडत असताना ...
- निराश व बदल घडत असताना .....
- आनंद व उत्साहात ....

# ५ ते १२ वयोगटातील मुलांसाठी

**पुढारी :** मुलांशी बोला. दिवसभरात घडलेल्या गोष्टीबदल त्यांना विचारा. त्यांना सुचना विचारा. (उदा. रेडिओ, वर्तमानपत्रे, दूरदर्शन, मित्र, शाळा इत्यादी.)

या सर्व गोष्टीद्वारे आपल्याला कळते काल काय झाले किंवा गेल्या आठवडयात घडलेल्या घटना सांगतात.

बायबलमध्ये भूतकाळात घडलेल्या गोष्टी कथा आहेत. आमची आजची कथा यिर्मया संदेष्टा यहुदाच्या लोकांना देश सोडून गेल्यानंतर काय म्हणाला यावर आधारित आहे. ते दु:खी होते आणि संदेष्टयाचे काम म्हणजे भविष्यासाठी आशेवर ठेवणे. चांगले भविष्य देवांने त्यांना दयावे. यासाठी प्रार्थना करणे.

**माझ्याकडे तुमच्यासाठी चांगल्या योजना आहेत मी तुम्हाला आशा आणि चांगले भविष्य देईल. आणि तुम्हाला बंधिवासांतुन परत या ठिकाणी आणील. (यिर्मया २९.११ते १४)**

**सर्वांसाठी देवाची योजना आहे असा आमचा विश्वास आहे. चांगल्या भविष्याची आशा आहे.**

मुलांना बोलण्यास प्रोत्साहित करा.

- देवाने त्याच्यासाठी आखलेल्या योजना
- त्यांच्या आश काय आहेत.

आशा लिहिण्यासाठी पोस्टकार्डचा वापर करा.

'माझ्या आशा आहेत.... '

**गीत :**

**पुढारी :** काही वेळा आपल्याला मनाविरुध्द गोष्टी कराव्या लागतात. ज्या ठिकाणी जाऊ इच्छित नाही अशा ठिकाणी जावे लागते. अखरेचा निरोप द्यावयाचा असतो अशावेळी आम्ही दु:खी व कष्टी असतो.

## इंग्लडमध्ये आलेल्या एका तरुणीची कथा :-

## अनिसाची कथा -

## नाटयमय रितीने वाचावे

**कथा एखादयाला संवेदनशील ठरू शकते हे नेत्याने लक्षात ठेवावे.**

**अनिसा :** माझे नाव अनिसा मी ५ वर्षाची असून मी इंग्लड मध्ये राहते. मी, माझी आई बाबा एका ट्रकच्या मागे लपून खूप शांत बसून येथे आलो. तेथील लोक आमच्यावर रागवले होते. आम्ही घाबरलो होतो म्हणून आम्हाला आमचा देश सोडावा लागला होतो मी रडले. मला माझा देश सोडुन जायचे नव्हते पण आईने समजावले की, देव आम्हांला मदत करेल व सुरक्षित ठेवेल.

**पुढारी :** जर तुम्हाला तुमचे घर सोडावे लागले तर तुम्हाला कशाची उणीव भासेल?

**अनिसा :** प्रवास खूप लांबचा होता, अस्वस्थ होतो. खूप थकलो होतो.आमच्याबरोबर आणखी एक कुटुंब होते. आम्ही बरेचदा आजारी असायचो, भुकेले, तहानलेले होतो. मी न रडण्याचा प्रयत्न केला. मी, माझे घर व माझी आवडती बाहुली तेथेच सोडून आलो होते. आम्ही ट्रकचा

प्रवास संपूवन बाहेर आलो तेव्हा अंधार व खूप थंडी होती. आम्ही अंगावरच्या कपडयानिशी आलो होतो. माझ्या वडिलांनी आम्हाला एका शेतात नेले. मी व मम्मी खूप घाबरलो होतो. त्या रात्री कुठे झोपलो ते आठवत नाही. सर्वजण गोंधळलेले होतो.

**पुढारी :** घर किंवा मित्र नसावे असे तुम्हास वाटते का? का?

मित्र असणे महत्वाचे आहे.? आपण एखादयाचे चांगले मित्र कसे बनू शकता?

**अनीसा :** या शहरात येईपर्यंत आम्ही वेगवेगळया ठिकाणी राहत होतो. आता आमच्याकडे भाडयाचे घर आहे. मी प्राथमिक शाळेत जाते. येथेच मी सुसानला भेटले. मी इंग्रजी शिकत असल्यामुळे आम्ही बोलु शकलो. ती माझी मैत्रिण झाली. तिला कल्पना आहे. मी दु:खी व घाबरत आहे. सुसानने माझ्या बद्दल तिच्या आजीला सांगितले. तिची आजी चर्चमध्ये गेली. त्यांनी अनेक इराणी एकत्र येत, अशा चर्चशी संपर्क साधला. ती मंडळी आमच्याकडे आली. कपडे, अथंरूण, खेळणी आणली. सुसानच्या आजीने मला विणलेल्या कपडयासंह एक बाहुली दिली.

**पुढारी :** छोटया छोटया गोष्टी खुप मोठा फरक करू शकतात नाही का? देव नेहमी काहीतरी आशा देईल आणि जीवनात बदल घडवून आणील.

**अनीसा:** मी इथे खूप आनंदी आहे. माझ्या वडिलांना नोकरी मिळाली. माझी आई स्थानिक महाविद्यालयात शिकत आहे. तिला नर्स व्हायचे आहे. तरीही आम्हाला आमचे पहिले घर, माझे कुटुंब आठवते. आता मला समजत आहे कि देवाची आमच्यासाठी ही एक योजना होती.

**पुढारी :** वेगवेगळया देशांतील लोकांना स्वत:च्या देशापासून दूर जावे लागते. दूर धोकादायक प्रवास करावा लागतो. कुटुंबियांना आणि मित्रांना निरोप दयावा लागतो. नवीन ठिकाणी घर शोधण्याचा प्रयत्न करावा लागतो.

त्यांना स्वातंत्र्य आणि सुरक्षितेता हवी आहे. देव भविष्यासाठी आशा देईल.

## प्रार्थनेसाठी खालील कल्पना वापरा : -

- **प्रशंसा :** ‘पॅराशूट’ म्हणुन कागदाची पत्रिका किंवा कपडयाचा लांब तुकडा. सर्व मुले ‘पॅराशुट’ प्रत्येक वेळी उंचवतात एकत्र म्हणतात. **हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो.!**

**हे देवा, आम्ही तुझे आभार मानतो !**

- **वर्तुळात बसलेली मुले :** वर्तुळात बसलेली मुले एक दगड एकमेकांकडे पास करतात. प्रत्येक मुलाकडे दगड गेल्यावर त्याला मनात काहीतरी विचार करायला सांगावा. ज्यासाठी त्याला क्षमा मागावी लागेल.

  **आपण केलेल्या कृतीची देवासमोर मुलांना क्षमा मागण्यास सांगावे.**

- **हॉप्सकॉच प्रार्थना** : जमीनीवर समांतर रेषेची एक जाळी काढा त्यात १ ते ६ अंक लिहा. प्रत्येकांला एका क्रमांकावर फेकण्यासाठी गारगोटी किंवा दगड दया. ज्या अंकावर दगड किंवा गारगोटी जाईल त्या क्रमांकावर असलेली **संबंधीत विषयावरील प्रार्थना करावी.**

**विषय :**

१. **धन्यवाद** - कोणत्याही एका गोष्टीबद्दल देवाचे आभार माना.

२. **क्षमा / क्षमस्व -** चुकीचे शब्द, कृती किंवा प्रवृत्तीसाठी देवाची क्षमा मागा.

३. **कृपया :** इंग्लंड, वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडमधील लोकांचा विचार करा. तेथील मुले आणि तुरूणांसाठी देवाकडे आशीर्वाद मागा.

४. **धन्यवाद :** कोणत्याही दोन गोष्टीसाठी आभार माना.

५. **कृपया :** स्वत:च्या कुटुंबासाठी आणि मित्रासाठी प्रार्थना करा.

६. **आशा :** 'भविष्यकाळातील आशा' याबद्दल सांगा.

**प्रार्थना :** प्रिय देवा, अनिसाला सुरक्षित ठेवल्याबदल तिला व तिच्या कुटुंबाला सुरक्षित भविष्य दिल्याबद्दल आम्ही तुझे आभार मानतो. अनेक मुलांना आपले घर सोडुन नवीन ठिकाणी प्रवास करावा लागत आहे. त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. ते दु:खी किंवा भयभीत असतात तेव्हा त्यांच्याकडे लक्ष ठेव. त्यांच्या जीवनाची आशा त्यांना दे. जेव्हा इतरांना बोलून किंवा दुष:कृत्य करुन अस्वस्थ करतो त्याचा आम्ही खेद व्यक्त करतो.

प्रेमळ वडिल आणि आईप्रमाणे तू आम्हांस क्षमा केलीस व इतरांना क्षमा करण्यास आम्हा मदत केली आम्हाला भविष्यासाठी आशा दिल्यास त्याबद्दल धन्यवाद! आमेन

**हस्तकला उपक्रम:-**

- इंग्लड आणि वेल्स आणि नॉर्दड आयर्लंडचे ध्वज रंगवा,
- दगड रंगवा किंवा सजवा. दगड मोठा असावा. त्यावर संदेश लिहा. ‘आशा, प्रेम, आनंद, शांती
- कार्ड किंवा कागदावर हृदयांचा आकार काढा.

त्याला रंगवा, आंगठयाचा / बोटांचा ठसा, किंवा इतर पध्दतीने मध्यभागी संदेश लिहा. ‘देव प्रिती आहे.’

- मोठया मुलांसाठी - विणलेल्या कागदाची, हृदयाच्या आकाराची बॅग तयार कर. त्यात चॉकलेटस् किंवा मिठाई ठेवा.

देवाच्या प्रेमाचे चिन्ह म्हणून या तयार केलेल्या व सजविलेल्या वस्तू कोणालाही देवू शकता.

**संदेष्टयांप्रमाणेच देवाचा संदेश पोचविण्याचे कार्य आपल्यावर सोपविले आहे.**

## खेळ :

## विश्वास :

**कधी - कधी देवावर विश्वास ठेवणे कठीण जाते. भीती, अडथळयांकडे लक्ष न देता देवाच्या मार्गदर्शनाची आशा धरावी.**

**१. मला पकडा! -**

आपला मित्र आपल्याला पडू देणार नाही या विश्वासाने एक व्यक्ति खाली पडते. (सुरक्षितेतसाठी, प्रतिसाद देण्यासाठी प्रौढ व्यक्तीजवळ असणे आवश्यक आहे. )

**२. अडथळा शर्यत :**

उपलब्ध गोष्टीतून साधे अडथळे तयार करा. लाकडी सामान, खेळाचे साहित्य, बाहेरील नैसर्गिक अडथळयांचा वापर करा. दोन व्यक्तीची एक जोडी तयार करा. त्यातील एका व्यक्तीचे डोळे पट्टीने बांधावे. दुसरी व्यक्ती जोडीदारास अडथळयातून मार्ग काढण्यास मार्गदर्शन करेल. नंतर जोडीदारांचे डोळे पट्टीने बांधावे. अश्या रितीने प्रत्येकांवर मार्गदर्शन करणे, एकणे, सूचनांचे अनुकरण करण्याची वेळ येईल.

**३. मांडीवर बसणे :**

पुर्ण वर्तुळात सर्वाना उभे करावे. सर्वांचे तोंडे एकाच दिशेला आवश्यक आहे. तीन मोजल्याबरोबर मागे असलेल्या व्यक्तीच्या मांडीवर बसावे. हात मोकळे असावे. या खेळाचे रहस्य हळुहळू आणि हळुवारपणे बसण्यामध्ये आहे. घाबरू नका ! हा खेळ खेळण्यासाठी २/४/६ परिपुर्ण वर्तुळ असणे महत्वाचे आहे.

४. आभार! :

सर्वांनी वर्तुळात बसावे. एकाने वर्तुळाभोवती फिरावे. बसलेल्या पैकी एका व्यक्तीचे नाव घ्यावे. नाव असणाऱ्या व्यक्तीने प्रथम देवाचे आभार मानावे. नंतर ज्यांनी आजपर्यंत आधार दिला मदत केली. त्यांचे नाव घेवून आभार मानावे.

## इंग्लड वेल्स आणि नॉर्दन आयर्लंड शोधणे :

**कृती** : कार्डबोर्डची फिरकी/ स्पिनर बनवा. त्यांचे २५ रंगीत भाग करून १ ते २५ अंक लिहा. फिरकी फिरवून आकडयांशी जुळणारी हकीकत जाणून घ्या व आमच्या देशाचा मनोरजक प्रवास करा.

## इंग्लड वेल्स आणि नॉर्दन आयर्लंड हकीगत:

इंग्लड वेल्स आणि नॉर्दन आयर्लंड हे ब्रिटीश बेटांचे भाग आहे. जेव्हा स्कॉटलंड आणि सभोवतालची ६००० हुन अधिक बेटे जोडली गेली. तेव्हा आम्ही ‘दि युनाटेड किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन आणि नॉर्दन आयर्लंड’ बनतो.

१. आमच्याकडे प्रत्येकाचा स्वत:चा ध्वज आणि रक्षक - संत आहे. इंग्लडसाठी -सेंट जॉर्ज, वेल्ससाठी सेंट डेव्हिड, आयर्लंडसाठी - सेंट पॅट्रीक

## सरकार आणि राजपद

२. आमचे लोकशाही राज्य आहे. व पंतप्रधान सुध्दा मतदानाद्वारे निवडून येतात. आमच्याकडे एक राणी (किंवा राजा) राज्य प्रमुख असतात.

३. लंडन मध्ये आपले स्वागत आहे!.

हे राजधानीचे शहर तेथे सरकारी इमारती आहेत त्याला संसद म्हणतात. तिथे 'बिग बेन' नावाची प्रसिध्द असलेले घंटा असलेले ऐतिहासिक घडयाळाचा टॉवर आहे. हे घडयाळ एलिझाबेथ टॉवरवर लावले असून चारही बाजूनी वेळ दाखवते.

४. हे ब्रिटीश सम्राटाचे लंडनमधील अधिकृत निवास स्थान आहे. बंकिम हॅमच्या डयुकसाठी बाधली गेलेली ही वास्तू 'बकिंगहमॅ पॅलेस' या नावाने ओळखली जाते.

५. आपल्याकडे अनेक ऐतिहासिक राजवाडे व किल्ले आहेत. 'विडंसर कॅसल' (वाडा) सर्वात जुना राजवाडा, बांधकाम ९०० पेक्षा जास्त वर्षापूर्वीचे इंग्लडच्या राजाचे राहण्याचे मुख्य ठिकाण आहे हा शाही राजवाडा.

६. जेव्हा येथील नागरीक त्यांचा १०० वा वाढदिवस साजरा करतात तेव्हा त्यांना राणी (किंवा राजा) तर्फे वाढदिवस - शुभेच्छा कार्ड मिळते.

## अभिमानास्पद गोष्टी

७. आम्ही कदाचित एक लहान बेट असून परंतु आपल्याकडे संशोधकांचा दीर्घ इतिहास आहे. ज्यांनी जगाला नवीन ज्ञान दिले आहे.

८. आमचे शैक्षणिक धोरण : सर्व मुलांना १८ वर्षापर्यंत मोफत शिक्षण आहे. फी भरून शिक्षण देणाऱ्या खाजगी व स्वतंत्र शाळा देखील आहेत. आमच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यासाठी इतर देशातून अनेक विद्यार्थी येतात. 'ऑक्सफोर्ड आणि केंब्रिज' ही इंग्लडची सर्वात प्रसिध्द आणि ऐतिहासिक विद्यापीठे आहेत.

९ आमच्याकडे समशितोष्ण हवामान आहे हे आमचे भाग्य!

हिरवागार ग्रामीण भाग आणि शेतजमिनीचा आम्हाला अभिमान आहे.

१०. आपण सर्व बेटे आहोत जे देशात कुठेही नाही. आपण समुद्रापासून ७५ मैलांपेक्षा जास्त अंतरावर आहोत.

## आयरिश समुद्रावर

११. आता आम्ही नॉर्दन आयर्लंडचा प्रवास करू

मुख्य शहर 'बेलफास्ट' आहे. येथे आयरिश लोक आपले स्वागत करतात आहेत. ते आदरातिथ्यासाठी प्रसिध्द आहेत.

१२. नॉर्दन आयर्लंडमध्ये असलेला 'जायंट्स कॉजवे' हा सुमारे बल्साट खडकाच्या ४० हजार षट्कोनी स्तंभांनी बनलेला आहे. ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर याची निर्मिती झाली.

१३. 'लोफ नेअघ' नॉर्दन आयर्लंडमधील लोफ नेअघ हा ब्रिटिश बेटांमधील सर्वात मोठा तलाव आहे.

## बेटांचा आणखी सुंदर भाग !

१४. वेल्स - आमचा बेटाचा आणखी एक सुंदर भाग!

वेल्समधील सर्व रस्त्यांची चिन्हे दोन भाषांमध्ये लिहिली आहेत. वेल्श आणि इंग्रजी.

१५. वेल्समधील एका शहराचे नाव जगातील सर्वात लांब लचक नाव आहे.

**Lianfairpwillgwyngyllgogerychwryndrobwillantysiliogogogoch**

इंग्रजी भाषांतर "St. Mary's Church in the hollow of white hazel near a rapid whirlpool and the Church of St. Tysilio near the red cave."

१६. आपल्याकडे अनेक प्रसिध्द लेखक, कवी शोधक,  संशोधक, संगीतकार आहेत जे जगभर ओळखले जातात.

**अधिक गोष्टी जाणून घ्या**

१७. फुटबॉल (सॉकर) इंग्लंडमध्ये उगम पावला. क्रिकेट, रग्बी आणि टेनिस सारखे इतर खेळ एथेच सुरु झाले. आमचे काही फूटबॉल क्लब जगप्रसिध्द आहेत.

१८. तुम्ही इंग्लंड, वेल्स किंवा नॉर्दर्न आयर्लंडमधील कोठेही गेलात तर मासे आणि चिप्स, सॅडविचचे प्रकार, चीज आणि क्रीम टी, या पदार्थाची चव चाखा हे पदार्थ तुम्हाला नक्की आवडतील.

१९. आपल्या आजुबाजुला सुंदर समुद्र आणि सागरीकिनारे आहेत . मासेमारी आणि नौकायान, सर्फिंग आणि पोहणे - पण सावधगिरी बाळगा. आपल्या सभोवतालचे समुद्र खूप थंड होऊ शकतात.

२०. स्टोनहॅन्ज एक प्रसिध्द प्रागैतिहासिक स्थापत्य आहे. महापाषाण शिळापासून (विशाल दगडापासून ) एक चक्राकार रितीने उभी केलेली आकृती आहे. इजिप्तमधील पिरॅमिडपेक्षाही जुनी आहे. निर्माण करण्यात आली आहे. पाषाण युगात आणि कांस्य युगात इ.स.पूर्व ३००० मध्ये निर्माण करण्यात आले आहे.

२१. विश्वास ठेवा अगर नका !

टपाल तिकिटाचा उगमस्थान हेच! पहिले टपाल तिकिट १८४० मध्ये व्यवहारात आणले.

२२. 'पेनीस' आणि 'पाउंड' हे जगातील सर्वात जुने चलन १२०० वर्षानंतरही आजही व्यवहारात वापरत आहोत.

२३. चला परत लंडनला जाऊ! लंडनमध्ये जगातील सर्वात मोठे ग्रंथालय / लायब्ररी आहे.

२४. लंडनमध्ये जगातील सर्वात मोठी शहरी सार्वजनिक वाहतूक, भूमिगत (अंडरग्राउंड), ओव्हर ग्राउंड वाहतूक सेवा, सतत आणि सुलभ रितीने या सेवा उपलब्ध आहेत.

२५. जगातील सर्व देशांतील लोक लंडन शहराला भेट देण्यासाठी येतात. मूळ रहिवाशी व भेट देण्यास येणाऱ्या पाहुण्यांमार्फत जवळ जवळ ३०० पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात.

आम्हाला आशा आहे की आपण इंग्लंड, वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडच्या या प्रवासाचा आनंद लुटला असेल.

## कृती

- देशाच्या ध्वजला रंग द्या.
- पोस्टकार्ड माझी आशा आहे.
- हृदयाच्या आकाराची पिशवी विणणे.
- देशाच्या नकाशाचा खेळ खेळणे.

.................................................................................................

भाषांतर :सौ. उज्वला अनिल रेड्डी
मुंबई धर्मप्रात महिला मंडळ
सी.एन्.आय्.

# जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह

जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह हे आयर्लंड येथील स्त्रियांनी सुरू केले व ते १९८२ मध्ये अंतरराष्ट्रीय चिन्ह म्हणून मान्य केले गेले दरवर्षी मार्च महिन्यांच्या पहिल्या शुक्रवारी ही विशेष भक्ती महिला चालवतात. सर्व मंडळी उपासनेत सहभागी होतात. १७० देशातील लोक यात भाग घेतात. माहितीपूर्ण प्रार्थना व प्रार्थनापूर्वक कृती या या बीद्र वाक्याद्वारे ऐकमेकांशी वर्षभर संबध प्रस्थापित होतात.





पहिले प्रतिक - चारहि दिशांकडून केद्रभागी बाण दाखवले.

दुसरे प्रतिक - गुडघे टेकून प्रार्थना करणारी व्यक्ती

तिसरे प्रतिक - जगातील सर्व भाषिकांचे एकत्रिकरण

चौथे प्रतिक - वर्तुळ म्हणजे जग

पाचवे प्रतिक - यामध्ये वरील सर्व प्रतिक एकात एक गुंफलेली आहेत.

# १३ ते १८ वयाच्या युवागटासाठी कार्यक्रम

## नेत्यासाठी मार्गदर्शक तत्वे :-

हे उपक्रम युवा गटातील तयार करण्यात आले आहेत. ‘‘तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत, ते तुम्हांविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत, ते मी जाणतो.’’ यिर्मया २९:१ १४ ज्यामध्ये देव चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रसंगी त्यांच्यासोबत आहे.

या कार्यक्रमात युवकांच्या जीवनासाठी आशा, हेतू , योजना, उद्धेश व सुरक्षित जागा यावर जोर दिला गेला आहे.

## पुढारी वर्गा करिता -मार्गदर्शक तत्वे-

‘सुरक्षित जागा’ काय आहे हे समजुन घेण्याचा प्रयत्न करा.

१. या गटात मांडलेली प्रत्येक गोष्ट गोपनीय ठेवावी. अपवाद व्यक्तीला / स्वत:ला किंवा इतरांना इजा होण्याचा धोका असू शकतो.
२. जे सांगितले आहे ते स्वीकारण्याचा प्रयत्न करा. न्याय करू नका-प्रत्येकाचा आदर सर्वदा करा.
३. आपल्या स्वत:ची सुरक्षा आणि चांगल्या सराव मार्गदर्शक तत्वांनुसार कार्य करा.

४. स्वत:ची काळजी घ्या. काही कठिण वाटत असेल तर कोणाशी तरी संवाद साधा. मदत घ्या.

## प्रस्ताविक खेळ :

### १. खरे की खोटे? (१० मिनिटे)

उद्देश - इंग्लंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंडमधील आमच्या काही वस्तूचा परिचय करुन देणे.



आवश्यक साहित्य - फोटोच्या प्रती

तरूणांना फोटो दाखवा

मतदानाद्वारे योग्य उत्तर ओळखण्यासाठी

त्यांना ‘अ’ आणि ‘ब’ हे दोन्ही स्पष्टीकरण द्या.

दोन नेत्यांना प्रत्येकी एक स्पष्टीकरण वाचण्यास सांगा.

तरूणांना त्यांचे स्पष्टीकरण योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करा.

**(योग्य उत्तर ठळक अक्षरात आहे. )**

**अ: हा लाकडी चमचा प्रेमाच्या प्रतिकांनी सजलेला आहे. प्रियकराने त्याच्या प्रेयसीला भेट म्हणुन दिला जात असे ही परंपरा वेल्समधील १६०० च्या दशकांची आहे. यात कोरीव काम करणाऱ्या व्यक्तीचे कौशल्य दाखवण्याचा हेतु आहे.**

ब. चमच्याच्या आकारात तयार केलेला हा एक छोटा तराफा आहे. वेल्समधुन एका खडयातुन तराफा न बुडता वर चढवणे ही तुमची नौकाविहार क्षमता दाखविते. ही तुमच्या खऱ्या प्रेमाची निशाणी समजतात.

## २.  बारडॉग



अ:  हे एक बारडॉग आहे.-उत्तर आयर्लंडमधील मुलांसाठी एक लाकडी वाद्य यात एका मुलाला बसवुन लाकडी चमचा वापरून काडयांवर वाजवून संगीत तयार करायचे.

**ब: ही एक बारडॉग म्हणजे मोठी टोपली आहे. जी गाढव  किंवा लहान पोनीच्या बाजुला लटकलेली. ज्याचा वापर उत्तर आयर्लंडमध्ये खत, जनावराचे शेण जमिनीवर पसरविण्यासाठी केला जातो.**

## ३. एक वस्तू



**अ: ही एक वस्तू आहे. ज्यामध्ये एक लहान भेट किंवा खेळणी ठेवतात.यूके मध्ये ख्रिसमस/नाताळाच्या सणाच्या वेळी दोन लोक ते ओढून वेगळे करतात.**

ब: ख्रिसमसच्या वेळी शेकोटी पेटविण्याची ही एक सामग्री आहे.

**स्पष्ट करा. -** प्रत्येक वस्तूचा एक हेतू असतो. तुम्ही जेथे राहता तेथील विशेष असलेल्या काही गोष्टी वस्तू तुम्ही सांगू शकता का? तुमच्या देशात लोक कसे राहातात याबद्दल इतरांना काही सांगू शकता का?

प्रत्येक गोष्ट व्यक्ती एका विशिष्ट हेतूने बनविलेली असते. त्या आपल्या सर्वांचा समावेश आहे.

**माझ्या जीवनासाठी देवाचा हेतू इच्छा काय आहे? हे स्पष्ट करा. (२० मिनीटे)**

**उद्देश :** देवाने तरूणांना साध्या व सर्जनशील मार्गाने का उत्पन्न केले याचा विचार करण्यास मदत करणे.

**आवश्यक साहित्य कार्य पत्रिका -**

अ, जिंजरब्रेड व्यक्तीचे टेम्पलेट, पेन -

देवाने प्रत्येकाला एका विशेष उद्देशाने बनवले आहे. पण मला आश्वर्य वाटते - देवाने मला का उत्पन्न केले?

देवाने तुम्हाला कौशल्याने, प्रेमाने निर्माण केले व जगाकडे पाहण्याचा एक अनोखा, अद्वितीय दृष्टिकोन दिला आहे. तो तुम्हाला तुमच्या जीवनासाठी देवाचा उद्देश काय आहे हे समजून घेण्यास मदत करू शकतो.



**डोळे** : आपल्या डोळयांची जोडी पेपरवर काढा. प्रश्न लिहा.

माझ्या आजूबाजू मला कोणत्या गरजा दिसतात?

आमच्या सभोवतालचे जग तुकडे - तुकडे झालेले, अन्यायी आहे. देवाने निर्मिलेले हे जग नव्हे.

आमच्या डोळयांना दिसणारा अन्याय दूर करण्याची आवश्यकता काय आहे? बेघर? गरिबी? लैंगिक हिंसा? संघर्ष?

देव आपल्याला हे अन्याय पाहण्यासाठी वेगवेगळे आध्यात्मिक डोळे देतो. व त्याच्या सेवेचा भाग होण्यासाठी आमंत्रित करतो.



**हृदय** - पेपरवर हृदय काढा. प्रश्न लिहा. विचार करा.

मला काय करायला आवडते?

देवाने तुमचे हृदय प्रेमासह निर्माण केले.

मग तुम्हाला कोणत्या गोष्टी करायला आवडतात?

कोणत्या गोष्टी तुम्हाला आनंद देतात?

उदाहरणार्थ : धावणे, संगीत किंवा इतरांची सेवा करणे.

कशामुळे तुमचे हृदय प्रक्षुब्ध होते.?



**हात आणि पाय** - हात व पाय पेपरवर काढा. व प्रश्नांची उत्तरे लिहा

- देवाने मला दिलेली कौशिल्ये व प्रतिभा काय आहेत ?
- आम्ही अशा जगात किंवा संस्कृतीत राहतो.
- जेथे आमच्या क्षमतेची लाज व निरभिमान वाटतो. पण देवाने तुम्हाला बुध्दि व प्रतिभा या देणग्या देवून निर्माण केले. उदाहरणार्थ : लेखन, वाद्य वाजविणे, सार्वजनिक चर्चा, लोकांना हसविणे, सुखी करणे.
- देवाने तुम्हाला दिलेली कौशल्ये व प्रतिभा देणग्या कोणत्या आहेत? त्या इतरांना कशा लाभदायक ठरू शकतात.

**वरील क्रिया हया देवाने तुमच्या जीवनाच्या उद्देशाबाबत विचार करण्याचा एक सोपा व सर्जनशील मार्ग आहे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनाचा एक विशिष्ट हेतू आहे. आम्हास झालेले पाचारण केवळ आम्ही पूर्ण करण्यास पात्र आहोत.**

## अडथळयावर मात : (२० मिनिटे)

ध्येय : आपल्या स्वत:च्या आशा आणि योजनांमधील अडथळे दूर करण्यासाठी देव आपल्याला मदत करतो.

आवश्यक साहित्य : ए ४ कागद, प्रत्येक संघासाठी कागदी क्लिपचा डबा

'दि शार्ड' इमारतीची फोटो, विजेत्या संघासाठी बक्षीस (खापरीने बनविलेले)

**४ जणांचा एक गट करा.**



दि शार्ड इमारतीचा फोटो बघा. युरोपमधील पाचव्या क्रमांची ९६ मजली ३०९.७ मीटर (१,०१६ फूट) उंच 'दि शार्ड' ही युनाटेड किंगडम लंडनमधील गगनचुबी इमारत

गटाने स्वत:ची 'दि शार्डची प्रतिकृती बनवा.

नियम :

- फक्त दिलेले साहित्य वापरू शकता.
- कागदाचे पेपर व कागदाच्या क्लिपस तुमचा टॉवर मोकळा कोणताही आधार न घेता उभा असावा (भिंतीला धरून नाही.)
- गटातील सदस्यांशी चर्चा करण्यासाठी फक्त ५ मिनिटे
- तुमचा टॉवर बांधण्यासाठी तुमच्याकडे १० मिनिटे असतील पण सर्वांच्या सहभागाने एकदा तुम्ही टॉवर बांधायला सुरूवात केली. की गटात संवाद, चर्चा करू शकत नाही. केवळ Action / कृतीद्वारे बोलू शकतात.

**हे बांधकाम संपल्यावर विजेत्यांची घोषणा करा थोडा वेळ चर्चा करा.**

१. या कामात तुम्हाला कोणत्या आडथळयांचा सामना करावा लागला? त्यांच्यावर मात करण्यासाठी तुम्ही एकत्र काम कसे केले?

२. देवाचा आपल्या जीवनासाठी एक हेतू आणि योजना आहे. ती पूर्ण करण्यासाठी आपल्याला कोणते अडथळे येतात?

३. अशा कठिण प्रसंगी आपण कोणत्या गोष्टी करतो? देवाचा अनुभव कसा घेवू शकतो?

## प्रतिबिंब (१५ मिनिटे)

नेता : क्रृपया यिर्मया २९:१-१४ यावर चर्चा करा

''तुम्हाविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो''

तुमचा हिताचे संकल्प आहेत.

ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणार आहे. ही वचने आपल्याला सांगतात की, जीवनात काय घडत आहे याची (यिर्मया २९:११)

पर्वा न करता देव आपल्यासोबत आहे, आपण एकटे नाही. असा विश्वास असला पाहिजे. देवावर आपण किती प्रेम करतो आणि देवाला कशा प्रकारे स्वीकारतो यावरही हे अवलंबून आहे. तुम्हाला ज्या भविष्याची आशा आहे ते तुम्हाला देण्याची देवाची योजना आहे. तुमच्या आशा देवासाठी खूप महत्वाच्या आहेत. देवाला तुमच्या जीवनात सहभागी व्हावयाचे आहे. तुमच्या आशा, तुमचे दुःख, आंनद, सर्वकाही जाणून घ्यायचे आहे. त्यासाठी देवाला शरण जाऊन पूर्ण जीवे भावे परमेश्वराचा शोध घ्या.

## जागतिक प्रार्थना दिनाची 'आशा' : (१० मिनिटे)

**ध्येय :** देवाच्या उद्देशाची जाणीव करून देणे.

तरूणांना आपल्या सभोवतालच्या व जगातील अन्यायाबद्दल विचार करण्यास लावणे. ते बदलण्यासाठी वचनबध्द होण्यास प्रोत्साहित करणे.

**आवश्यक साहित्य :** कागदाचे तुकडे, मार्कर, इंटरनेटसह फोन, कॅमेरा

**स्पष्टीकरण :** आपल्या सभोवतालचे जग तुकडे तुकडे झालेले अन्याय निराशेने भरलेले आहे. देवाने निर्माण केले जग असे नाही.

या दोहोत फरक समजण्यासाठी देवाने तुम्हाला शहाणपण बुध्दि, चातुर्य ही दाने देवुन निर्माण केले आहे.

इंग्लंड, वेल्स आणि नॉर्दन आयर्लंडमधील तरूण वर्ग आशा निर्माण करणारे व संस्कृती परिवर्तन करणारे आहे. देव त्यांचा उपयोग निराशाजनक ठिकाणी प्रकाश देण्यासाठी करत आहे.

# ग्रेसची कथा व फोटो :-




माझे नाव ग्रेस आहे मी २४ वर्षाची आहे. जे युके मध्ये सुरक्षितता शोधतात. त्यांचे स्वागत मिठी मारून केले जाते आवश्यक आधार दिला जातो.

भूमध्य समुद्र ओलांडून युरोपमध्ये पोहोचण्यासाठी आपला जीव धोक्यात घातला हया युकेमधील दाखविण्यात आलेल्या बातम्याकडे मी दुर्लक्ष करू शकल नाही. माझे हृदय भग्न झाले. लोकांना त्यांची घरे सोडून पळ काढावा लागला. आमच्या खंडात पोहचवण्यासाठी....

मी कॉलिसमध्ये माझ्या वास्तव्यात मानवतेबद्दल बरेच काही शिकले चांगले वाईटही पाहिले. आमचे काही दिवस व आठवडे खूप क्लेशदाय होते. आम्ही अश्रुधूरामध्ये अडकलो. पोलीसांची मारहाण पाहिली. आमचे मित्र आम्हांला लिबियामधील त्यांच्या अनुभवाच्या कथा सांगत. सहारा वाळवंटात भूमध्यसागर ओलांडून, बोटीवर ते तुरूंगात खूप त्रासदायक होते. मी माझ्या मित्रांना अशा भयानक प्रसंगातून जात असल्याचा विचार सहन करू शकले नाही. मला वाटते लोकांना माझ्या मैत्रीमध्ये नविन आशा मिळाली.

त्यांना दिवसातून दोन वेळा गरम जेवण देणे. त्यांच्याशी संबध निर्माण करणे. त्यांची तपासणी करणे. त्या लोकांना व्यक्ती म्हणुन वागवणे आवश्यक होते. पण हे फक्त तात्पुरते आहे. ते लवकरच, आशेने सुरक्षित असतील. जागतिक प्रार्थनादिनी ग्रेसची ही आशा निर्वासितांसाठी आहे.

हया जागतिक प्रार्थना दिनी तुमची काय अपेक्षा आहे? आम्हांला जगभरात उत्साही आशा देणाऱ्यांची चळवळ निर्माण करायची आहे. एखादया न आवडलेल्या समस्येविषयी लिहून गटात व सोशल मिडीयावर पाठवा, चर्चा करा.

ग्रेसचे निर्वासितांबद्दल प्रेम, आदर उत्कट होते. तिच्या उत्कटतेने तिला व्यावहारिक मार्गाने सेवा करण्यास प्रवृत्त केले. या आठवडयात अन्यायाचे रूपांतर करण्यासाठी तुम्ही कोणती मदत करू शकता?

## शेवटची प्रार्थना :

आमच्या संपूर्ण जीवनाच्या देवा, आम्ही तुझे आभार मानतो. आमच्या दु:खात तू आमच्यासोबत असतो याचा आनंद आम्हास वाटतो. आम्ही एकटे असतो.

तेव्हा तूं आम्हां सान्निध्य असतो. आमच्या जीवनात आम्ही तुला आमंत्रित करतो.

जेव्हा आम्ही एकटे, भयभीत, निराश असतो तेव्हा आमच्या समवेत अस.

येशू ख्रिस्तान वधस्तंभावर दु:ख भोगले पण ती पुनरूत्थानाची आशा होती.

आमच्या आशा समस्या एकमेकांना सांगण्यासाठी विचार मन शब्द दे.

येशू ख्रिस्ताच्या नावात आमेन

..................................................................................................

भाषांतर :सौ. उज्वला अनिल रेड्डी
मुंबई धर्मप्रात महिला मंडळ
सी.एन्.आय्.

# जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह

जागतीक प्रार्थना दिनांचे चिन्ह हे आयर्लंड येथील स्त्रियांनी सुरू केले व ते १९८२ मध्ये अंतरराष्ट्रीय चिन्ह म्हणून मान्य केले गेले दरवर्षी मार्च महिन्यांच्या पहिल्या शुक्रवारी ही विशेष भक्ती महिला चालवतात. सर्व मंडळी उपासनेत सहभागी होतात. १७० देशातील लोक यात भाग घेतात. माहितीपूर्ण प्रार्थना व प्रार्थनापूर्वक कृती या या बीद्र वाक्याद्वारे ऐकमेकांशी वर्षभर संबध प्रस्थापित होतात.





पहिले प्रतिक - चारहि दिशांकडून केद्रभागी बाण दाखवले.

दुसरे प्रतिक - गुडघे टेकून प्रार्थना करणारी व्यक्ती

तिसरे प्रतिक - जगातील सर्व भाषिकांचे एकत्रिकरण

चौथे प्रतिक - वर्तुळ म्हणजे जग

पाचवे प्रतिक - यामध्ये वरील सर्व प्रतिक एकात एक गुंफलेली आहेत.

**कॉपीराईट २०२० जागतीक प्रार्थना दिवस आंतरराष्ट्रीय समिती, इंक.**

इंग्लंड वेल्स आणि नॉर्दर्न आयर्लंडच्या जागतिक प्रार्थना समितीने २०२२ च्या जागतिक प्रार्थना दिनाच्या आणि भक्ती आणि शैक्षणिक उपक्रमांसाठी ''मला तुमच्यासाठी असलेल्या योजना माहित आहेत'' तयार केल्या आहेत. राष्ट्रीय किंवा स्थानिक समित्या आणि त्यांच्या भागीदारी संस्थांना आयोजित केलेल्या जागतिक प्रार्थना दिना कार्यक्रमांच्या विशेष वापरासाठी जागतिक प्रार्थना दिनानिमित्त साहित्य विकसित केले आहे. इतर कोणत्याही वापरासाठी जागतिक प्रार्थना दिन २०२२ संसाधन पॅकेटमधील साहित्य जागतिक प्रार्थना आंतरराष्ट्रीय समितीच्या परवानगीशिवाय पुनरूत्पादित केले जावु शकत नाही.

मर्यादित पुनरूत्पादन अधिकार आणि बायबल अभ्यास, उपासन सेवा, देशाची पार्श्वभूमी मुलांचा कार्यक्रम, कलाकृती आणि कलाकारांचे विधान, जागतिक प्रार्थना दिनानिमित्त रचना केलेली गाणी आणि छायाचित्रे पुनरूत्पादित केली जाऊ शकतात. मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक मंडळे आणि गटांसह जागतिक प्रार्थना दिनाच्या क्रियांसाठी, योग्य श्रेय दिल्यास. जागतिक प्रार्थना दिन राष्ट्रीय / प्रादेशिक समित्यांना

जागतिक प्रार्थना दिन कार्यक्रमाच्या उद्देशाने संसाधनांचे पुनरूत्पादन पुन्हा विकण्याची परवानगी आहे. जागतिक प्रार्थना आंतरराष्ट्रीय समितीच्या वतीने संबंधित जागतिक प्रार्थना दिन राष्ट्रीय / प्रादेशिक समित्याच संसाधन पॅकेट किंवा साहित्याचे विभाग ऑनलाईन उपलब्ध करू शकतात. ऑनलाइन उपलब्ध साहित्य उपलब्ध करून देणाऱ्या समित्यांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की ऑनलाईन साहित्य वापरणारे गट आणि व्यक्ती समितीला जबाबदार आहेत.

पूजा सेवेसाठी आणि मुलांच्या कार्यक्रमासाठी सुचवलेली गाणी प्रकाशकांकडून कॉपीराईट केलेली माहिती समाविष्ट करतात. गाण्यांचे पुनरूत्पादन किंवा भाषांतर करण्याची प्रकाशकांकडून मिळणे आवश्यक आहे. डब्ल्यूडीपीआयसी फक्त मूळ गाणी डब्ल्यूपीपी कार्यक्रमांसाठी तयार केलेली गाणी पुनरूत्पादित किंवा अनुवादित करण्याची परवानगी देते.

जागतिक प्रार्थना दिना उपक्रमांशी संबंधित कोणतेही अर्पण किंवा निधी गोळा करणे जागतिक प्रार्थना दिन समितीला कळवावे.

पवित्र शास्त्रातील कोटेशन बायबलच्या नवीन सुधारित आवृत्तीतील आहेत. कॉपीराईट १९८९ मध्ये यूएसए मधील

नॅशनल कौन्सिल ऑफ चर्चेस क्राइस्टच्या ख्रिश्चन शिक्षणाच्या विभागाने आणि परवानगीने वापरले जातात. सर्व हक्क राखीव अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क साधा.

जागतिक प्रार्थना दिवस आंतरराष्ट्रीय समिती

४७५ रिव्हरसाइड ड्राइव्ह रूम ७२९

न्यूयॉर्क, न्यूयॉक १०११५. यूएसए

admin@worldayofpraer.net – http: // worlddayof prayer.net

..................................................................................